24 APR 2024

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदेंचे वाङ्मय करुणेने भरलेले

## किशोर बेडकिहाळ : शिवाजी विद्यापीठातील अध्यासनातर्फे ग्रंथ प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन वैचारिक, सामाजिक आशयाबरोबर वाङ्मयीन गुणवत्तादृष्ट्या श्रेष्ठ स्वरूपाचे होते. त्यांच्या संवेदनशील आणि संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या ललित लेखनात आहे. त्यांचे वाङ्मय हे करुणेने भरलेले आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाच्या प्रकाशनावेळी डावीकडून रणधीर शिंदे, विजया पाटील, किशोर बेडकिहाळ, श्रीकृष्ण महाजन, टी. एस. पाटील, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त प्रा. एन. डी. पाटील प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या डॉ. विजया पाटील-वाडकर लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. प्राचार्य टी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

'महर्षी शिंदे यांची सूक्ष्म अवलोकन दृष्टी, संपन्न अनुभवविश्व व अंतर्दृष्टीचा आवाका त्यांच्या वाङ्मयातून व्यक्त झाला आहे. त्यांची ललित लेखक म्हणून ओळख 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथामुळे झाली असल्याचे बेडकिहाळ यांनी सांगितले. प्राचार्य पाटील यांनी महर्षी शिंदे यांच्या बहुजनवादी राजकारण, सामाजिकतेचे वेगळेपण नमूद केले. 'एकवीसाव्या शतकातही निर्भिड विचारांचे दार्शनिक' अशी ओळख असणाऱ्या महर्षी शिंदे यांच्या कार्य आणि या ग्रंथाचे अनेक पैलू त्यांनी उलगडून दाखविले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. विजया पाटील, राहुल पवार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, राजन गवस, सुरेश शिपूरकर, माया पंडित, शरद नावरे, प्रकाश पवार, भारती पाटील, अशोक वाडकर, वसंतराव मुळीक उपस्थित होते. राजेश पाटील यांनी आभार मानले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

### लेखनशैलीने महाराष्ट्र मन घडविले

'महर्षी शिंदे यांच्या विचारविश्व आणि लेखनशैलीने महाराष्ट्राचे मन आणि हृदय घडविले आहे. या ग्रंथातून शिंदे यांच्या वाङ्मय कंगोऱ्यांचा उत्तमरीत्या परिचय करून दिला असल्याचे डॉ. महाजन यांनी सांगितले.

24 APR 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# स्टोरीमॅप स्पर्धेत डॉ. अभिजीत पाटील विजेते

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राष्ट्रीय स्तरावरील स्टोरीमॅप स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील अध्यापक डॉ. अभिजीत पाटील यांनी विजेतेपद प्राप्त केले आहे. 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे: द जिऑलॉजिकल ट्रेजर' या विषयावरील प्रकल्प त्यांनी सादर केला. याबद्दल विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. अभिजित पाटील यांचे अभिनंदन केले.



**कोल्हापूर : डॉ. अभिजीत पाटील यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत डॉ. सचिन पन्हाळकर.**

जीआई एस क्षेत्रातील जगातील संस्था असलेल्या एस्री- इंडिया संस्थेमार्फत तीन वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर स्टोरी-मॅप स्पर्धा घेण्यात येते. स्पर्धेसाठी गतवर्षी (२०२३) डॉ. पाटील यांनी 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे: द जिऑलॉजिकल ट्रेजर' या विषयावरील प्रकल्प सादरीकरण केला. स्पर्धेमध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट विजेता घोषित केले.

**बांदिवडे गावासंदर्भातील वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प**

या स्पर्धेसाठी डॉ. पाटील यांनी निवडलेला विषय हा कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठारालगत असणाऱ्या बांदिवडे (ता. पन्हाळा) या गावातील अग्नि स्तंभांवर आधारित आहे. भारतातील सर्वात दुर्मिळ बहुभुज स्तंभ, बेसॉल्ट संरचना या ठिकाणी पहावयास मिळते. याची निर्मिती ६५.६ दशलक्ष वर्षांपूर्वी झाली असावी. येथील काही स्तंभाची उंची ४० मीटरपेक्षा जास्त आहे. जगामध्ये अशा संरचना खूपच कमी पाहायला मिळतात. डॉ. अभिजित पाटील यांनी या संपूर्ण परिसराचे ड्रोनद्वारे त्रिमितीय सर्वेक्षण केले. तसेच या परिसराचे भूगर्भीय, पर्यटन व शैक्षणिक महत्त्व या स्पर्धेसाठीच्या मांडणीतून अधोरेखित केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 APR 2024
सकाळ

# शुक्रवार, शनिवारच्या परीक्षा विद्यापीठाने पुढे ढकलल्या

## लोकसभा निवडणुकीच्या प्रशिक्षणामुळे निर्णय

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सध्या सुरू आहे. विद्यापीठ आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांसाठी लोकसभा निवडणुकीचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. त्यामुळे शुक्रवारी (ता. २६) आणि शनिवारी (ता. २७) होणाऱ्या बी. एस्सी., एम. एस्सी., नॅनो सायन्स, बी. व्होक आदी विविध अभ्यासक्रमांच्या ३८ परीक्षा विद्यापीठाने पुढे ढकलल्या आहेत.

मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा विविध केंद्रांवर सुरू आहेत. काही अभ्यासक्रमाच्या परीक्षा शुक्रवारी, शनिवारी पूर्वीच्या नियोजनानुसार आयोजित केल्या आहेत. मात्र, या दिवशी लोकसभा निवडणुकीचे प्रशिक्षण विद्यापीठ, महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांसाठी होणार आहे. त्यामुळे या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यात शुक्रवारी आयोजित केलेल्या १७ परीक्षा आणि शनिवारच्या २१ परीक्षांचा समावेश आहे. त्यासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या एकूण संख्या अनुक्रमे ७ हजार १७५ आणि ७ हजार २३ इतकी आहे, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

### 'बी. एस्सी. बी. एड्'साठी करा ३० एप्रिलपर्यंत अर्ज

'विद्यापीठात बी. एस्सी., बी. एड् (आयटीईपी) हा एकात्मिक चार वर्षांचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून सुरू होत आहे. त्यासाठीच्या नॅशनल कॉमन एंट्रन्स टेस्टसाठी बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण किंवा ज्यांनी बारावी विज्ञान शाखेची आता परीक्षा दिली आहे, अशा विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत आहे', अशी माहिती शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 APR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाने २६-२७ एप्रिलच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल सत्रातील २६ व २७ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

दि. २६ व २७ रोजी काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. तथापि, या दिवशी विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना लोकसभा निवडणूक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या कारणास्तव दोन्ही दिवशी विद्यापीठ स्तरावरील होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 APR 2024
लोकमत

# शुक्रवारच्या परीक्षा ढकलल्या पुढे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल मधील उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. मात्र, विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी लोकसभा निवडणूक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असल्याने २६ व २७ एप्रिल या दिवशीच्या नियोजित परीक्षा रद्द केल्या आहेत. या परीक्षांचे पुढील सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.